क्रमांक/अका/सेतु/कावि/ २९७ /२०१७
जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ
दिनांक- १८/५/२०१७

**बळीराजा चेतना अभियान**

जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

सरळ मुलाखतीने कंत्राटी तत्वावर पद भरण्याबाबत सुचना

---

बळीराजा चेतना अभियानांतर्गत शेतकरी विशेष कक्ष , जिल्हाधिकारी कार्यालय , यवतमाळ करीता शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्यणसाठी निम्मलिखीत अगदी तात्तपुरत्या स्वरुपात कंत्राटी पदाकरीता खालील अर्हता प्राप्त उमेदवारांची यवतमाळ जिल्हा सेतु सोसायटी मार्फत सरळ मुलाखतीने अकरा महिन्याकरीता नियुक्ती करावयाची आहे.

जाहिरातीमध्ये नमुद पदांसाठी आवश्यक अर्हता पात्रता नसलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करु नयेत.

**पदभरतीचा कार्यक्रम-**

| | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचा कालावधी | जाहिरात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासुन १० दिवस |
| पात्र /अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक- ६/६/२०१७ |
| सरळ मुलाखत बाबत सुचना | www.yavatmal.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| भरती प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वेळोवेळी www.yavatmal.nic.in या संकेतस्थळावर **चालु घडामोडी मध्ये सुचना पाहावी. या संदर्भात स्वंतत्र पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.** | |

१. कंत्राटी पदाचे नाव- **जिल्हा प्रकल्प अधिकारी** (बळीराजा चेतना अभियान)

| पदाचे नाव | मानधन रुपये | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| कंत्राटी जिल्हा प्रकल्प अधिकारी (बळीराजा चेतना अभियान) पद-१ | एकत्रित मानधन रुपये-२६०००/- | १. एम.बी.ए. (एच.आर.असल्यास प्राधान्य)<br>२. कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |

उपरोक्त कंत्राटी तत्वावरील पदांकरीता उमेदवारांनी जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ (सेतु विभाग) येथे कार्यालयीन वेळेत बंद लिफाफयामध्ये अर्ज व प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती दिनांक-३१/५/२०१७ पावेतो सादर करावे. अर्जाचा नमुना व संपुर्ण जाहिरात यवतमाळ जिल्हयाचे **संकेतस्थळ www.yavatmal.nic.in** वर चालुघडामोडी या सदराखाली उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**अटी व शर्ती-**

१. वरिल पद पुर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असुन ११ महिन्याकरीता आहे. नियुक्त केलेल्या शासनाचे आस्थापनेवर हक्क प्रस्तापित करता येणार नाही.
२. उच्चत्तम अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
३. वरील पदांकरीता उमेदवाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा अधिक नसावे.
४. वरील पदांकरीता मुलाखत संबधि सुचना जिल्हयाचे संकेतस्थळ www.yavatmal.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल.याबाबत संबधित उमेदवार यांना स्वंतत्रपणे पत्र व्यवहार केला जाणार नाही.
५. नियुक्त उमेदवारांनी कामाचे स्वरुपात काम न केल्यास कोणतेही कारण न देता कामावरुन कमी करण्यात येईल.
६. आवश्यक संपुर्ण कार्यवाही झाल्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.
७. नियुक्त केलेल्या उमेदवारांना नियमित आस्थापनेवरील शासकीय कर्मचा-यांना अनुज्ञेय असणारे शासकीय सेवेचे व इतर अनुषंगीक कोणतेही लाभ व भत्ते मिळणार नाही.
८. अर्ज सादर करतेवेळी मुळ कागदपत्र सोबत जोडण्यात येवु नये.मुळ कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात याव्यात.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा सेतु सोसायटी यवतमाळ

दिनांक-